# नक्षलवादी चळवळीचा आदिवासींच्या सामाजिक व आर्थिक जीवनावर झालेला परिणाम

**तेजराम यादव गायधने**
संशोधक विद्यार्थी
वाणिज्य व व्यवस्थापन संशोधन विभाग
विद्या विकास कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय समुद्रपूर जि. वर्धा
महाराष्ट्र राज्य, भारत

**सारांश :**

नक्षलवाद आणि आदिवासी यांचा जवळचा संबध आहे. शेतकरी व आदिवासींचे शोषण थांबविण्यासाठी किंवा त्याविरोधात आवाज उठविण्यासाठी निर्माण झालेली चळवळ आज मात्र आदिवासींच्या गळयाचा फास झालेली आहे. आदिवासींचा आर्थिक-सामाजिक विकास न होण्यामागे नक्षल चळवळीचा फार मोठा हात आहे असे म्हणायला हरकत नाही. नक्षल प्रभावीत क्षेत्रातील आदिवासींच्या सामाजिक, सांस्कृतीक, राजकिय, शैक्षणिक, आर्थिक इ अनेक समस्या ज्या निर्माण झालेल्या आहेत त्या निर्माण होण्यामागे नक्षल चळवळ कारणीभूत आहे. आदिवासींचे मानवी हक्क पायदळी तुळविल्या जात आहेत. एकीकडे आड तर दुसरीकडे विहीर अशी स्थिती आदिवासींची झाली. नक्षलवादी आणि पोलिसांच्या लढाईत अनेक दिवस आदिवासी भरडले गेले आहेत. नक्षलवाद्यांची माहिती पोलिसांना न दिल्यामुळे, नक्षलवाद्यांना सहकार्य करणे, त्यांना जेवण देणे इत्यादी कारणांसाठी आदिवासींवर गुन्हे दाखल केले जातात. तर दुसरीकडे पोलिसांचा खबऱ्या म्हणून नक्षलवाद्यांतर्फे संशयतांचा गळा चिरून हत्या केली जाते. मग अशावेळी जीव जाण्यापेक्षा पोलीस केस परवडली असा पवित्रा आदिवासी घेतात. दोन्ही बाजूंनी बंदुका एकाचे साम्राज्य दिवसा, तर दुसऱ्याचे रात्री यामुळे चोविस तास भीतीच्या सावठाखाली राहायचे आणि जमेल तेवढे गप्प राहायचे फारसे तोंड उघडायचे नाही. मार पडला तरी सहन करायचा आणि दोन्ही कडील बंदुकींचा दस्ता आपल्यावर पडणार नाही याची खबरदारी घ्यायची व आपले जीवन जगायचे एवढेच आदिवासींच्या हाती शिल्लक उरले आहे.

**बीजशब्द** - नक्षलवाद, आदिवासी, विकास, सामाजिक, आर्थिक, नक्षलचळवळ

**प्रस्तावना :**

भारतीय आदिवासींसमोर काही नवीन आव्हाने व नवीन प्रश्न बदलत्या काळापासून उभे राहिलेले आहेत एका विशिष्ट संक्रमण अवस्थेत असलेल्या कोणत्याही विकसनशील देशात नवीन समस्यांची झड प्राथमिक अवस्थेतील जीवन जगणाऱ्या लोकांना अधिक लागते. पश्चिम बंगालमधील नक्षलबारी या गावातून निर्माण झालेली नक्षलवादी चळवळ ही आदिवासी बहुल भागामध्ये (दंडकारण्य क्षेत्रामध्ये) वाढताना आपणास दिसते पण ही चळवळ आदिवासी क्षेत्रांमध्येच का वाढते आहे व गैर आदिवासी भागांमध्ये या चळवळीचा अत्यल्प प्रतिसाद मिळतो आहे, कारण काय आहे? तसेच नक्षलवादी चळवळीचा आदिवासी जीवन मूल्यांवर काय परिणाम झाला आहे? हे अभ्यासणे अगत्याचे ठरते. प्रस्तुत शोध प्रबंधात या सर्व बाबींवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

**उदिष्टये :**

१) आदिवासी व नक्षलचळवळ यांचा संबध अभ्यासणे.
२) नक्षलचळवळीचा आदिवासी जीवनावर पडलेला सामाजिक व आर्थिक परिणाम अभ्यासणे.

**गृहितकृत्ये :**

१) नक्षलवाद व आदिवासी यांचा जवळचा संबध आहे.
२) नक्षलवादामुळे आदिवासींच्या मानवी हक्कांची पायमल्ली होत आहे.
३) पोलिस आणि नक्षलवाद या दोन्ही कडून आदिवासींचे शोषण होत आहे.
४) नक्षल चळवळीचा आदिवासींच्या सामाजिक व आर्थिक जीवनावर नकारात्मक प्रभाव पडलेला आहे.

**तथ्य संकलन :**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये द्वितीयक स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. आणि वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे

**संकल्पनात्मक मांडणी :**

१) **गिलीन यांच्या मते -** "एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानीय गटाच्या समस्येला आदिवासी समाज म्हणतात."

२) **डब्ल्यू जे पेरी यांच्या मते -** "समान बोलीभाषा व एकाच समान भूप्रदेशावर वास्तव्य करणाऱ्या समूहाला आदिम समाज असे म्हणतात."

३) **विनोद मिश्रा**- नक्षलवादी चळवळ ही प्रत्येक अत्याचाराच्या विरोधात विद्रोहाचे प्रतीक आहे त्यामुळे विद्रोहाच्या सर्वच विचारधारा यामध्ये समाविष्ट आहेत.

**विश्लेषण :**

**नक्षलवाद आणि आदिवासी**

सर्वच आदिवासीबहुल क्षेत्र नक्षलग्रस्त नसतो परंतु नक्षलग्रस्त क्षेत्र मात्र आदिवासी बहुत क्षेत्र असतो यावरून असे लक्षात येते की नक्षलवादाला पोषक वातावरण आदिवासी क्षेत्रामध्ये असल्यामुळे नक्षलवादाचा तिथे खूप मोठ्या प्रमाणात प्रसार झालेला आहे. त्या मागे अनेक कारणे आहेत त्यामधील मुख्य कारणांमध्ये गरिबी, दारिद्र्य, निरक्षरता, अलिप्तता इत्यादी वैशिष्ट्यामुळे नक्षल चळवळीसाठी पोषक वातावरण आदिवासी बहुल क्षेत्रामध्ये बघायला मिळतो त्यामुळे नक्षल चळवळीने आदिवासी बहुल क्षेत्रात आपले पाय घट्ट रोवले आहे. त्यामुळे नक्षलवादाचा आणि आदिवासींचा जवळचा संबंध येतो. आदिवासींच्या विकासासाठी झटणारी व शोषणाविरुद्ध लढा देणारी चळवळ आज मात्र आदिवासींमध्ये दहशत निर्माण करण्यास व त्यांच्या शोषणास कारणीभूत ठरत आहे.

**आदिवासींचे मानवी हक्क व नक्षलवादी चळवळ**

मानवी अधिकार म्हणजे प्रत्येक व्यक्ती ही मानव आहे आणि मानव असल्यामुळे निसर्ग जे अधिकार प्राप्त होतात त्यांना मानवी अधिकार असे म्हणतात. हेरॉल्ड लॉस्की या राजकीय विचारवंतांच्या मते “ज्या परिस्थितीच्या घटकाशिवाय व्यक्तीला आपली सर्वांगीण प्रगती साध्य करता येत नाही त्या परिस्थितीच्या घटकांना मानवी अधिकार असे म्हणतात“ बेन्याम या राजकीय विचारवंतांच्या मते “जगातील प्रत्येक व्यक्तीला ती मानव आहे या एकाच कारणास्तव ज्या अधिकाऱ्यांची प्राप्ती होणे गरजेचे असते त्या अधिकाऱ्यांना मानवी अधिकार असे म्हणतात.” तसेच १९९३ च्या मानवी अधिकार संरक्षण अधिनियमात केलेली व्याख्या “मानवी अधिकार म्हणजे व्यक्तीचे जीवित स्वातंत्र्य समता आणि प्रतिष्ठा यासंबंधीचे संवैधानिक संरक्षण बहाल केलेले आणि मानवी अधिकाऱ्यांच्या जागतिक जाहीरनाम्यात समाविष्ट करण्यात आलेले आणि भारतीय न्यायव्यवस्थेद्वारा ज्यांची जोपासना करण्यात येते ते अधिकार होय.”[1]

भारतीय राज्यघटनेमध्ये नागरी व राजकीय हक्क यांचा समावेश भाग तीन मध्ये कलम १४ ते ३२ मध्ये करण्यात आला आहे तर आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक हक्काचा समावेश भाग चार मध्ये कलम ३६ ते ५१ मध्ये करण्यात आला आहे.[2]

नक्षलग्रस्त आदिवासी क्षेत्रात मात्र मानवी हक्क व अधिकारांची पायमल्ली केल्या जात आहे. जो कोणी नक्षल चळवळीला कोणत्या ना कोणत्या कारणाने प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे विरोध करेल त्याला शिक्षा देणे याला ते वर्गशत्रू असे म्हणतात. अशा या वर्गशत्रूच्या नावाखाली अनेक स्थानिक आदिवासी लोकांची हत्या या नक्षलवाद्यांनी केली आहे. एकट्या गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी आत्तापर्यंत ७१३ आदिवासींना अतिशय क्रूरपणे ठार केले आहे. अशा क्रूरतेच्या गाथा सांगणाऱ्या अनेक घटना सांगता येतील. भामरागड तालुक्यातील नवीन वाडी खिंडीच्या जंगलातील नक्षलवादी व पोलीस यांच्यातील चकमक प्रसिद्ध आहे. १९९५ ला जंगलात पहिली चकमक झाली आपल्या ठिकाणची माहिती दिल्याच्या संशयावरून नक्षलवाद्यांनी या गावचे मोठे शेतकरी कारू कुडियामी याची हत्या केली कुडियामी कुटुंबाने गाव सोडले सारी शेती जावई राणू दुर्वाला कसायला दिली, नंतर अकरा वर्षांनी २००८ मध्ये राणू दूर्वाने पोलिसांना घराच्या अंगणात बसू का दिले म्हणून राणूची हत्या केली, एवढ्यावरच ते थांबले नाही तर शेतातले पीक जाळून टाकले तेव्हापासून कुडियामी कुटुंबातल्या विधवा भामरागडला एका झोपडीत राहून मजुरी करून कशीबशी गुजरान करीत आहेत. गावाकडे यायचेच नाही असा फतवा नक्षलवाद्यांनी कुटुंबासाठी काढला आहे.[3]

२८ जानेवारी २०१४ मध्ये छत्तीसगडच्या सीमेलगतच्या गडचिरोली जिल्ह्यातील किष्ठापूर या अतिशय दुर्गम गावी मध्यरात्री सुमारे १०० नक्षलवाद्यांनी सर्व गावकऱ्यांना मुख्य चौकात गोळा केले, या गावकऱ्यांसमोर किराणा दुकानदार राजू आत्राम वय ४५ वर्ष व प्रतिष्ठित नागरिक लक्ष्मण सीडाम यांना उभे केले. राजूने पोलीस पथकाला बिस्किटाची पॉकिट विकले म्हणून तर सिडाम यांनी पोलिसांच्या मेळाव्यात गाणी गाऊन चळवळीच्या नियमांचा भंग केल्याचे जाहीर करण्यात आले व या दोघांनी पोलिसांना चळवळीची कुठलीही माहिती दिली नसल्याचे सांगितले परंतू त्यांचे म्हणणे नाकारून त्यांना जेवढ्या दूर पडता येईल तेवढे पडा असे नक्षलवाद्यांनी फरमावले हे दोघेही जीवांच्या आकांताने पळू लागले

[1] मिसाळ चंद्रकांत, (२०१८) मानवी हक्क व जबाबदाऱ्या, सक्सेस ट्री पब्लिकेशन्स, सदाशिव पेठ, पुणे. पृष्ठ २८

[2] कित्ता – पृ. ७६

[3] देवेंद्र गावंडे, (२०१२) नक्षलवादाचे आव्हान दंडकारण्यातील अस्वस्थ वर्तमान, साधना प्रकाशन, पुणे. पृष्ठ ४०

नक्षलवाद्यांनी त्यांच्यावर गोळ्यांच्या फैरी झाडत त्यांचा जीव घेतला गावातील कुणीही अशी कृत्य केले, तर त्याचीही अशीच गत होईल असे धमकावून ते गावातून निघून गेले.[4]

८० च्या दशकात हि चळवळ या भागात रुजू लागली, तेव्हा नक्षलवाद्यांचे एखाद्याला शिक्षा करण्याचे प्रकार सौम्य स्वरूपाचे होते ज्याला लक्ष केले आहे त्याच्या नावाची एक पत्रक काढायचे त्यातून कृती सुधारण्याचा इशारा द्यायचा तरीही ऐकत नसेल तर त्याला गाठून मारहाण करायची आणि तरीही तो ऐकत नसेल तर मग त्याची हत्या करायची अशी या शिक्षेची स्वरूप होते तेव्हा एखाद्याला शिक्षा करण्याची कारणे ही जनतेच्या प्रश्नाशी निगडित असायची नंतर हळूहळू या शिक्षेची तीव्रता वाढत गेली. इचळवळ माओवाद्यांच्या ताब्यात आल्यानंतर तर सरळ सरळ मुडदे पाळायलाच सुरुवात झाले जंगलात फिरताना रोज पोलिसांशी चकमक होऊ शकत नाही अशा स्थितीत आपले अस्तित्व दाखवण्यासाठी व त्यातून जनतेत दहशत निर्माण करण्यासाठी स्थानिक लोकांचे हत्या सत्र नक्षलवाद्यांनी सुरू केले आहे याची हत्या करायची आहे त्याच्या गावात जायचे गाव दुर्गम भागात असेल तर सायंकाळी, अन्यथा रात्री जायचे, अज्ञानी, अशिक्षित व साधी मराठी भाषा न येणाऱ्या, वर्गशत्रू म्हणजे काय हे न कळणाऱ्या आदिवासीला घरातून बाहेर काढायचे आणि गावकऱ्यांच्या समोर त्याला गुरासारखे झोडपून ठार करायचे, कुऱ्हाड किंवा कोयत्याने आदिवासींचा गळा कापायचा अशी अंगावर शहारे आणणारी पद्धत नक्षलवाद्यांनी अंगीकारली आहे.[5]

23 नोव्हेंबर २००३ मध्ये रात्री गडचिरोली जिल्ह्यातील कमलापूर गावातील अहेरीदलच्या नऊ ते दहा शस्त्रधारी नक्षलवाद्यांनी शंकर चिन्हा कुडमिथे राहणार गोडसे गोडम या युवकास तो पोलिसांचा खबरी आहे या कारणाने त्याची कमलापूर येथे कुराडीच्या धारदार शस्त्राने वार करून निर्गुण हत्या केली.[6]

एकीकडे आड तर दुसरीकडे विहीर अशी स्थिती आदिवासींची झाली. नक्षलवादी आणि पोलिसांच्या लढाईत अनेक दशकांपासून आदिवासी भरडले जात आहेत. नक्षलवाद्यांची माहिती पोलिसांना न दिल्यामुळे, नक्षलवाद्यांना सहकार्य करणे, त्यांना जेवण देणे, त्यांना माहिती देणे इ. कारणांसाठी आदिवासींवर गुन्हे दाखल केले जातात. तर दुसरीकडे पोलिसांचा खबऱ्या म्हणून नक्षलवाद्यांतर्फे संशयतांची गळा चिरून हत्या केली जाते. मग अशावेळी जीव जाण्यापेक्षा पोलीस केस परवडली असा पवित्रा आदिवासी घेतात. दोन्ही बाजूंनी बंदुका. एकाचे साम्राज्य दिवसा, तर दुसऱ्याचे रात्री यामुळे २४ तास भीतीच्या सावठाखाली राहायचं आणि जमेल तेवढे गप्प राहायचं, फारसे तोंड उघडायचे नाही. मार पडला तरी सहन करायचा आणि दोन्हीकडील बंदुकींचा दस्ता आपल्यावर पडणार नाही याची खबरदारी घ्यायची व आपले जीवन जगायचे एवढेच आदिवासींच्या हाती शिल्लक उरले आहे.[7]

**नक्षलवादी चळवळ आणि आदिवासींचे शैक्षणिक जीवन**

आदिवासींचे शैक्षणिक विकासासाठी सरकार हल्ली अनेक प्रकारचे प्रयत्न करीत आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात सरकारने आदिवासींच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले परंतु त्याला मर्यादा होत्या १९२८ मध्ये ओ. एच. पी. स्टंट यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी जमातीच्या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी समिती नेमली होती. १९३० मध्ये या समितीने आपला अहवाल सादर केला शिक्षणाच्या दृष्टीने या समितीने जंगलमय आणि डोंगराळ भागातील आदिवासींच्या शिक्षणासाठी मोफत वस्तीगृह काढण्याची शिफारस केली होती, तसेच १९३८ साली सरकारने सिग्मिंटन नावाच्या आयसीएस अधिकाऱ्याची मुंबई प्रांतातील आदिवासी लोकांची सर्वांगीण पाहणी करण्यासाठी नेमणूक केली. यामध्ये प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सरकारने घ्यावी, सर्व आदिवासी विभागात सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू करावे, प्रत्येक तालुक्यात वस्तीगृह काढावीत आणि आश्रम शाळा सुरू कराव्यात अशा महत्वाच्या सूचना करण्यात आल्या. गडचिरोली जिल्ह्यात गडचिरोली अहेरी व भामरागड या तीन तालुक्यांच्या ठिकाणी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पं कार्यालय आहेत यात गडचिरोली २७, अहेरी २६ व भामरागड २७ अशा एकूण ७८ आदिवासी आश्रम शाळा तर २५ आदिवासी वस्तीगृहे आहेत. यातून तीस हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत या शिक्षणाच्या माध्यमातून आदिवासी ची प्रगती व्हावी व तो मुख्य प्रवाहात यावा यासाठी शासनाकडून विविध उपक्रम राबविले जातात, परंतु या भागातील नक्षलवादी चळवळीमुळे येथील शिक्षण व्यवस्था ही प्रभावीत झालेली आहे. १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिवस व २६ जानेवारी प्रजासत्ताक दिवस म्हणून सर्व देश साजरा करतो परंतु गडचिरोली जिल्ह्यातील काही शाळांमध्ये नक्षलवादी हा दिवस काळा दिवस म्हणून पाळायला सांगतात व शाळेतील तिरंगा झेंडा उतरून काळा झेंडा फडकला लावतात विद्यार्थ्यांना व शिक्षकांना देश विरोधी घोषणा द्यायला लावतात.[8]

---

[4] कुबेर गिरीश (संपादक), चंद्रपूर जिल्हा प्रतिनिधी देवेंद्र गावंडे(२९ जानेवारी २०१२), शेकडो शेतकऱ्यांसमोर दोघांची नक्षलवाद्यांकडून हत्या, दैनिक लोकसत्ता मुद्रण व प्रकाशक डी इंडियन एक्सप्रेस लिमिटेड

[5] देवेंद्र गावंडे, (२०१२) नक्षलवादाचे आव्हान दंडकारण्यातील अस्वस्थ वर्तमान, साधना प्रकाशन, पुणे. पृष्ठ ४१

[6] श्री कृपासिंग (गृहराज्यमंत्री) यांची विधानसभेमध्ये लक्षवेधी सूचनेला उत्तर, महाराष्ट्र विधिमंडळ कार्यवाही अधिकृत प्रतवेदन हिवाळी अधिवेशन नागपूर,(१९९९), प्रकाशन विधानसभा सचिवालय महाराष्ट्र शासन मुंबई.

[7] देवेंद्र गावंडे, (२०१२) नक्षलवादाचे आव्हान दंडकारण्यातील अस्वस्थ वर्तमान, साधना प्रकाशन, पुणे. पृष्ठ ३४

[8] तुळशे मिलिंद भारत, (२०१९) महाराष्ट्रातील नक्षलवादी चळवळ आणि आदिवासी जीवन : एक राजकीय अभ्यास, पीएच.डी. थिसिस, राज्यशास्त्र विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, नोव्हेंबर २०१९, पृष्ठ २५२-२५३

**शिक्षकांवर नक्षलवाद्यांची दहशत**

एकीकडे नक्षलवादी शिक्षणाला आमचा विरोध नाही असे सांगतात, परंतु प्रत्यक्षात शिक्षकाला मारहाण करणे, पोलिसांचा खबरी म्हणून त्याची हत्या करणे, अपहरण करणे, विद्यार्थ्यांना चळवळीत येण्यासाठी शिक्षकावर दबाव टाकणे, शासकीय आश्रम शाळेतील शिक्षकांना भोजनाची व्यवस्था करायला लावणे अशा प्रकारची छळवणूक केली जाते. १९८० मध्ये गडचिरोलीतील सिरोंचा भागातील प्राथमिक शिक्षक रुद्र राजू यांच्यावर पोलिसांचा खबऱ्या असा शिक्का मारून त्याचा उजव्या हात तोडण्यात आला. २७ जून २०१० मध्ये इटापल्ली तालुक्यातील गट्टा प्राथमिक शाळेतील शिक्षक राजहिमा ची नक्षलवाद्यांकडून हत्या करण्यात आली, कारण राजमा गावच्या शाळेचा दर्जा सुधारावा यासाठी तो सतत धडपड करायचा, गावात सर्वांशी मिळून मिसळून राहायचा, शाळेत येणाऱ्या प्रत्येकाचे स्वागत करायचा, मग ते गस्तीवरचे पोलीस असो वा गावचे सरपंच, यांच्याशी गावातील विविध प्रश्नांवर चर्चा करायचा, त्यामुळे त्याची लोकप्रियता वाढली होती, ही गोष्ट नक्षलवाद्यांच्या लक्षात आल्यामुळे राजू हिमाची हत्या नक्षलवाद्यांकडून करण्यात आली.[9]

नोव्हेंबर २०१३ मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील कोरची तालुक्यातील बडा झेलिया या गावातील जिल्हा परिषद शाळेत सशस्त्र जवान हे गस्ती करून आल्यानंतर विश्राम करीत असताना नक्षलवाद्यांनी रात्री साडेअकरा वाजता भुसुरंग लावून स्फोट घडवून आणला यात पाच जवान शहीद झाले व शाळेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले व आजही त्या शाळेत विद्यार्थी जायला घाबरतात.[10]

नक्षलग्रस्त भागातील शिक्षकांकडून नक्षलवादी जबरदस्तीने खंडणी वसूल करतात जीवाच्या भीतीचे कारण समोर करून जवळजवळ १८ टक्के शिक्षक दुर्गम भागात जातच नाहीत याचा परिणाम तेथील विद्यार्थ्यांच्या गळतीच्या प्रमाणात वाढ होताना दिसून येतो फक्त कागदोपत्री शिक्षण, दर्जेदार शिक्षण नाही. यावरून आपणास असे सांगता येईल की नक्षलवादी चळवळीमुळे या भागातील शिक्षण व्यवस्था ही प्रभावीत झाली आहे. राष्ट्र निर्मितीसाठी शिक्षण हे प्रभावी माध्यम असून ते या भागातील नक्षलवादी चळवळीमुळे क्षतिग्रस्त होताना दिसून येत आहे.[11]

**नक्षल चळवळीचा आदिवासींच्या आर्थिक स्थितीवरील प्रभाव**

शेतकऱ्यांची व आदिवासींची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी ज्या चळवळीची निर्मिती झाली ती चळवळ आज आदिवासींना दारिद्र्याच्या खाईत लोटले आहे. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष दोन्ही प्रकारे नक्षल चळवळीचा आणि आदिवासींच्या आर्थिक स्थितीचा जवळचा संबंध आहे नक्षल कारवाईमुळे आदिवासींच्या आर्थिक स्थितीवर फार मोठा परिणाम घडून आलेला आहे. शासकीय योजनांचा लाभ किंवा इतर विकासात्मक उपाययोजना आदिवासींपर्यंत पोहोचविल्या जात नाही याला कारण नक्षलवाद आहे. सार्वजनिक सोयी सुविधा, रस्ते, आरोग्य सेवा,शैक्षणिक सुविधा इत्यादी सर्व सोयी सुविधा नक्षल चळवळीमुळे प्रभावीत झालेल्या आहेत. नक्षल चळवळीमुळे आदिवासींच्या विकासाची सारे दरवाजे बंद झालेले आहेत. शेती, पशुपालन, दुग्ध व्यवसाय, वनउपज गोळा करणे इ. व्यवसाय करून आपली दैनंदिन गरज भागवण्यापुरते त्यांचे उत्पन्न आहे. याव्यतिरिक्त इतर कोणतेही उत्पन्नाचे स्त्रोत आदिवासी जमातीकडे नाही. आणि याला पुरेपूर कारणीभूत नक्षल चळवळ आहे. नक्षल चळवळीमुळे एक प्रकारचे दहशत या भागात निर्माण झालेली आहे.

**मानव विकास निर्देशांक व आदिवासी जमाती**

महबूब उल हक असे म्हणतात की "मानवी विकास प्रारूप हे विकासाची सर्वसमावेशक प्रतिमान आहे यामध्ये आर्थिक वृद्धी सामाजिक गुंतवणूक लोकांचे सबलीकरण मूलभूत गरजा आणि सुरक्षितता यांची तरतूद राजकीय आणि सांस्कृतिक स्वातंत्र्य आणि मानवी जीवनाचे इतर सर्व पैलू की ज्यांचा विकास होऊ शकेल अशा सर्वांचा या प्रारूपात समावेश होतो"

राव व्ही एम १९९६ यांच्या मते "मानवी विकास हा एका प्रक्रियेतून घडून येतो ज्यामध्ये कुटुंबीय पुरेशी गुंतवणूक करतात किंवा तसे करण्यास मदत करतात आणि महिला मुले व कुटुंबातील सर्व सदस्यांना सुदृढ आरोग्य शिक्षण उत्पादक संपत्ती आणि कौशल्य मिळवण्यासाठी समर्थ बनवितात." एकूणच मानवी विकासाच्या वेगवेगळ्या तज्ज्ञांनी लावलेला अर्थ लक्षात घेता शिक्षण आरोग्य आणि उपजीविकेचे साधन या जीवनाच्या तीन महत्त्वाच्या पैलूसाठी दिलेला लढा आणि त्याची प्रत्यक्षात झालेली पूर्तता याचा मिलन म्हणजे मानव विकास होय.

जागतिक मानव विकास अहवाल २०२० प्रसिद्ध करण्यात आला या अहवालात विविध प्रकारे असुरक्षिततेने ग्रासलेल्या आघातग्रस्त मानव समूहाच्या जागतिक समस्येवर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. भारताच्या संदर्भात असुरक्षित, आघातग्रस्त मानव समूहांच्या बाबतीत सांगायचे तर भारतातील दलित, आदिवासी, स्त्रिया आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांचा यामध्ये समावेश होतो, अशा प्रकारे सामाजिक व आर्थिक पातळीवरील विषमता व मागासलेपणाचा आघात सहन करावा लागणारा हा वर्ग भारतात मोठ्या प्रमाणात आहे. जगाच्या आणि भारताच्या तुलनेत भारतीय दलित आणि आदिवासींचा मानव विकास निर्देशांक जर पडताळून पाहिला तर भारतातील भीषण सामाजिक व आर्थिक विषमतेचे स्वरूप लक्षात येते. २००५ मध्ये यु एन डी पी (United Nations development program) ने दलित व आदिवासी जनसमुहाचा

---

[9] देवेंद्र गावंडे, (२०१२) नक्षलवादाचे आव्हान दंडकारण्यातील अस्वस्थ वर्तमान, साधना प्रकाशन, पुणे. पृष्ठ ७०

[10] कुबेर गिरीश (संपादक), नागपूर जिल्हा प्रतिनिधी देवेंद्र गावंडे,(२०१३) नक्षलवादयांचा सामना आणि उपाय,, दैनिक लोकसत्ता (०४/०२/२०१३) मुद्रण व प्रकाशन इंडियन एक्सप्रेस लि.नागपूर. पृ. ४

[11] तुळशे मिलिंद भारत, (२०१९) महाराष्ट्रातील नक्षलवादी चळवळ आणि आदिवासी जीवन : एक राजकीय अभ्यास, पीएच.डी. थिसिस, राज्यशास्त्र विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, नोव्हेंबर २०१९, पृष्ठ २५५-२५६

सामाजिक आर्थिक तसेच आरोग्य विषय घटकांची अभ्यास करून मानव विकास निर्देशांक निश्चित केला त्यानुसार दलितांचा मानव विकास निर्देशांक ०.३२८ होता तर आदिवासींचा मानव विकास निर्देशांक ०.२७० इतका होता हा मानव विकास निर्देशांक जागतिक क्रमवारीत १८७ व्या क्रमावर असणाऱ्या नायझर ०.३३७ या देशापेक्षाही खालावलेला आहे. म्हणजेच भारतातील दलित व आदिवासी हे जगातील अति मागास दुर्भिक्षग्रस्त देशापेक्षाही निम्न पातळीवरील जीवन जगत आहेत महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या २०१२ च्या मानव विकास अहवालाची मध्यवर्ती कल्पना सर्वसमावेशक विकास ही आहे. मानव विकासाची प्रगती ही फक्त मानव विकास निर्देशांकातील वृद्धी द्वारे मोजणी पुरेशी नसून समाजातील वंचित, शोषित व आर्थिक दृष्ट्या मागास गटांना मुख्य प्रवाहात सामील करणे गरजेचे आहे असे मानव विकास निर्देशांकाच्या प्रमुख निष्कर्षास अनुसरून आदिवासीची स्थिती समजून घेणे महत्त्वाचे आहे.[12]

वरिल विवेचनारुन असे लक्षात येते की, आदिवासी समाज आजही विकासाच्या प्रवाहापासून दूर आहे. त्यामध्ये भरीस भर नक्षलवादाची समस्या यामुळे नक्षलग्रस्त आदिवासींचे शोषण मोठया प्रमाणावर होत आहे.

**निष्कर्ष :**

१) नक्षल चळवळीसाठी पोषक वातावरण आदिवासी बहुल भागामध्ये असल्यामुळे नक्षलग्रस्त क्षेत्रामध्ये नक्षलवाद आणि आदिवासी यांचा जवळचा संबंध आहे.

२) अनेक घटनांवरून असे लक्षात येते की नक्षल प्रभावित आदिवासीबहुल भागामध्ये नक्षलवाद्यांनी हिंसाचार घडवून दहशत निर्माण केलेली आहे. त्यामुळे आदिवासींच्या मानवी हक्कांची पायमल्ली सर्रास सुरू आहे

३) नक्षल प्रभावित आदिवासी भागात आदिवासी लोक जीव मोठे धरून जीवन जगत आहेत पोलीस आणि नक्षलवादी या दोन्हीकडून आदिवासींना तोंड द्यावे लागत आहे.

४) बेकारी, दारिद्र्य, अशिक्षित पणा, निम्न मानव विकास निर्देशांक इत्यादी बाबींवरून असे लक्षात येते की नक्षल चळवळीचा आदिवासींच्या सामाजिक व आर्थिक जीवनावर नकारात्मक प्रभाव पडलेला आहे.

**संदर्भग्रंथ सूची**


१) मिसाळ चंद्रकांत, (२०१८) मानवी हक्क व जबाबदाऱ्या, सक्सेस ट्री पब्लिकेशन्स, सदाशिव पेठ, पुणे. पृष्ठ २८

२) कित्ता – पृ. ७६

३) देवेंद्र गावंडे, (२०१२) नक्षलवादाचे आव्हान दंडकारण्यातील अस्वस्थ वर्तमान, साधना प्रकाशन, पुणे. पृष्ठ ४०

४) कुबेर गिरीश (संपादक), चंद्रपूर जिल्हा प्रतिनिधी देवेंद्र गावंडे(२९ जानेवारी २०१२), शेकडो शेतकऱ्यांसमोर दोघांची नक्षलवाद्यांकडून हत्या, दैनिक लोकसत्ता मुद्रण व प्रकाशक डी इंडियन एक्सप्रेस लिमिटेड

५) देवेंद्र गावंडे, (२०१२) नक्षलवादाचे आव्हान दंडकारण्यातील अस्वस्थ वर्तमान, साधना प्रकाशन, पुणे. पृष्ठ ४१

६) श्री कृपासिंग (गृहराज्यमंत्री) यांची विधानसभेमध्ये लक्षवेधी सूचनेला उत्तर, महाराष्ट्र विधिमंडळ कार्यवाही अधिकृत प्रतवेदन हिवाळी अधिवेशन नागपूर,(१९९९), प्रकाशन विधानसभा सचिवालय महाराष्ट्र शासन मुंबई.

७) देवेंद्र गावंडे, (२०१२) नक्षलवादाचे आव्हान दंडकारण्यातील अस्वस्थ वर्तमान, साधना प्रकाशन, पुणे. पृष्ठ ३४

८) तुळशे मिलिंद भारत, (२०१९) महाराष्ट्रातील नक्षलवादी चळवळ आणि आदिवासी जीवन : एक राजकीय अभ्यास, पीएच.डी. थिसिस, राज्यशास्त्र विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, नोव्हेंबर २०१९, पृष्ठ २५२-२५३

९) देवेंद्र गावंडे, (२०१२) नक्षलवादाचे आव्हान दंडकारण्यातील अस्वस्थ वर्तमान, साधना प्रकाशन, पुणे. पृष्ठ ७०

१०) कुबेर गिरीश (संपादक), नागपूर जिल्हा प्रतिनिधी देवेंद्र गावंडे,(२०१३) नक्षलवादयांचा सामना आणि उपाय,, दैनिक लोकसत्ता (०४/०२/२०१३) मुद्रण व प्रकाशन इंडियन एक्सप्रेस लि.नागपूर. पृ. ४

११) तुळशे मिलिंद भारत, (२०१९) महाराष्ट्रातील नक्षलवादी चळवळ आणि आदिवासी जीवन : एक राजकीय अभ्यास, पीएच.डी. थिसिस, राज्यशास्त्र विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, नोव्हेंबर २०१९, पृष्ठ २५५-२५६

१२) Study corcle (2020) मानव विकास अहवाल 2020, Available online at ण्ह्यद्रद्मः//ध्रध्रध्र.द्मद्यद्वड्डन्ड्ढद्धण्ड्डदड्ढद्मद्म.ड्डदड्ड/ड्डन्द्रड्ढद्य-द्मद्रड्डत्/--2020--62/255


[12] Study corcle (2020) मानव विकास अहवाल 2020, Available online at ण्ह्यद्रद्मः//ध्रध्रध्र.द्मद्यद्वड्डन्ड्ढद्धण्ड्डदड्ढद्मद्म.ड्डदड्ड/ड्डन्द्रड्ढद्य-द्मद्रड्डत्/--2020--62/255